# मडगाव नगरपालिका

## मडगाव - गोवा

## जाहिरात

क्र. एमएमसी/एडीएमएन/२०२४-२०२५/४३६ दिनांकः २१/१०/२०२४

मडगाव नगरपालिका, मडगाव, गोवा यांचेकडून पुढे नमूद करण्यात आलेल्या पदांची कायमस्वरूपी तत्त्वावर भरती करण्याकरिता विहित नमुन्यातील अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अनु. क्र. | पदाचे नाव | पदांची एकूण संख्या | प्रवर्गानुसार रिक्त पदांची संख्या | वेतन श्रेणी | शैक्षणिक आणि इतर पात्रता |
|---|---|---|---|---|---|
| १. | कनिष्ठ विभाग लिपिक (लोअर डिव्हिजन क्लर्क) | ११ | यूआर -०५<br>ईडब्ल्यूएस -०१<br>ओबीसी -०२<br>एसटी -०२<br>पीएच -०१<br>(अंध आणि क्षीण दृष्टी) | वेतन सारणी स्तर-२ | **आवश्यक:**<br>१. उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र, मान्यताप्राप्त संस्थेकडून समतुल्य पात्रता.<br>२. किमान ३ महिने कालावधीच्या संगणक प्रशिक्षण यामधील प्रमाणपत्र.<br>३. ४० शब्द प्रती मिनिट गतीनुसार टंकलेखन.<br>४. कोंकणी भाषेचे ज्ञान.<br>**अपेक्षित:**<br>मराठी भाषेचे ज्ञान |
| २. | साइट सुपरवायझर | ०१ | यूआर -०१ | वेतन सारणी स्तर-२ | **आवश्यक:**<br>१. एसएससी उत्तीर्ण असावा.<br>**अपेक्षित:**<br>मराठी भाषेचे ज्ञान. |
| ३. | सहाय्यक गवंडी | ०१ | यूआर -०१ | वेतन सारणी स्तर-१ | **आवश्यक:**<br>१. इ. चौथी उत्तीर्ण असावा आणि बांधकाम क्षेत्रातील काम करण्याचा किमान २ वर्षांचा व्यावसायिक अनुभव असावा.<br>२. कोंकणी भाषेचे ज्ञान.<br>**अपेक्षित:**<br>मराठी भाषेचे ज्ञान. |

२. वय ४५ वर्षांपेक्षा अधिक नसावे (शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेले आदेश किंवा सूचनांना अनुसरून शासकीय कर्मचाऱ्यांकरिता ५ वर्षांपर्यंत शिथिलता) आणि शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेले आदेश आणि सूचनांना अनुसरून राखीव प्रवर्गातील उमेदवारांकरिता शिथिलता.

३. नियुक्ती नियम/जाहिरातीनुसार निकषांची पूर्तता करू शकत असणारे पात्र उमेदवारच केवळ अर्ज सादर करू शकतात. जन्म दाखला, शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्रे, वैध रोजगार विनिमय नोंदणी पत्र, १५ वर्षे रहिवासाचे प्रमाणपत्र आणि सक्षम प्राधिकृतीकडून जारी करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र इ. कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती तसेच विहित नमुन्यातील अर्जावर चिकटविण्यात आलेले पासपोर्ट आकारातील छायाचित्र यासोबत आपले अर्ज या कार्यालयाकडे दि. २३/१०/२०२४ ते ११/११/२०२४ या कालावधीत कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत प्रत्यक्ष पोच (हँड डिलिव्हरी) करावेत. अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख ही ११/११/२०२४ रोजी सायं. ५.०० वा. पर्यंत अशी आहे.

४. आपले अर्ज हे मुख्य अधिकारी, मडगाव नगरपालिका, मडगाव-गोवा यांना संबोधित केलेले असणे आवश्यक आहे. विहित तारखेच्या नंतर प्राप्त झालेले आणि विहित नमुन्यात नसणारे/ अपूर्ण/ किंवा संबंधित कागदपत्रे सोबत न जोडलेले अर्ज सरसकट नाकारण्यात येतील.

५. विविध पदांकरिता स्वतंत्र अर्ज सादर करणे अनिवार्य आहे आणि आपल्या अर्जामध्ये आपला प्रवर्ग नीट नमूद करणे अनिवार्य आहे.

६. जे उमेदवार आधीच शासकीय सेवेत कार्यरत आहेत, त्यांनी आपले अर्ज योग्य माध्यमाद्वारे सादर करणे आवश्यक आहे.

७. मुलाखतीस उपस्थित राहण्याकरिता टीए देण्यात येणार नाही.

**पहिले**
**सही/-**
**(दामोदर शिरोडकर)**
**अध्यक्ष, मडगाव नगरपालिका**

**सही/-**
**(मेल्विन वाझ)**
**मुख्य अधिकारी, मडगाव नगरपालिका**